ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक.
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधान: " इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १७ पुणें, बुधवार तारीख ९ मे, १९५१ अंक १९

## बँक ऑफ पूना, लिमिटेड.

( शेड्यूल्ड बँक )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | रु. २५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. १२,५०,००० |

— संचालक मंडळ —

१ श्री. मुरलीधर चतुरभुज लोया, ( चेअरमन )
२ श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी., व्हा. चेअरमन
३ डॉ. ना. भि. परुळेकर, संचालक 'सकाळ'
४ श्री. फ्रामजी पेस्तनजी पोचा, सीड्स मर्चंट
५ श्री. लक्ष्मीनारायण रामचंद्र राठी, बँकर्स व मर्चंट सोलापूर
६ श्री. नारायणदास श्रीराम सोमाणी, व्यापारी
७ श्री. गणपतराव काळूराम नाईक, बी. एस्सी., बी. ई., एलएल्. बी.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

मुख्य ऑफिस व सांगली शाखेंत मौल्यवान जिनसा सुरक्षित ठेवण्याची सोय.

ठेवींवर व्याज—
चालू खातें अर्धा टका, सेव्हिंग्ज १॥ टके,
मुदत ठेव १ वर्ष २॥ टके, ३ वर्षे ३ टके.

शाखा स्थानिक-(१) भवानी पेठ, व (२) सदाशिव पेठ, पुणें.
बाहेरगांवीं—सोलापूर, सांगली.
मुख्य ऑफिसः—५५५ रविवार पेठ, पुणें नं. २

गो. गं. साठे.
मॅनेजर.

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक )
पे-ऑफिस:—खोपोली ( जि. कुलाबा )

श्री. बी. बी. वाळवेकर ( अध्यक्ष ) | श्री. के. पी. जोशी ( उपाध्यक्ष )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ३,९९,२८५ |

एकूण खेळतें भांडवल ६३ लाखांचे वर

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. वाळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.

## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिड्यूल्ड बँक )

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

| | |
|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. ७,१९,४८५ |
| खेळतें भांडवल | रु. ७५,००,००० |

मुंबई शाखा:—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. चापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल्. बी., मॅनेजर.
श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर.

खालील कंपन्यांचा माल आमचेकडे
घाऊक व किरकोळ मिळतो.
या मालाची यादी मागवा.
म्हैसूर किर्लोस्कर लि. ............ किर्लोस्कर बंधु, लि.
किर्लोस्कर इलेक्ट्रिक कं.... किर्लोस्कर ऑईल एंजन्स लि.
ओगले ग्लास वर्क्स लि. ............ शिवाजी वर्क्स लि.
जी. जी. दांडेकर मशीन वर्क्स लि. ... बेळगांव मोटार्स
पॅरी आणि कं. लि.
केळकर बंधु, लक्ष्मीरोड, पुणें २

# विविध माहिती

**हैद्राबादची विकासयोजना**—हैद्राबाद संस्थानच्या औद्योगिक विकासाची एक योजना आखण्यांत आली आहे. ह्या योजनेवर ५ वर्षांत ४० कोटी रुपये खर्च होणार आहेत. ह्या रकमेपैकीं ३० कोटी रुपये हैद्राबाद सरकारनें उभे केल्यास १० कोटी रुपये कर्ज देण्याचें भारतीय सरकारनें कबूल केलें आहे.

**पोस्टाचें नवें तिकीट**—परराष्ट्रीय टपालहंशिलींत सुधारणा करण्यांत आली असल्यामुळें ३॥ आण्यांच्या तिकिटाऐवजीं २॥ आण्यांचें नवें तिकीट काढण्यांत आलें आहे. ह्या तिकिटावर गडद तांबड्या रंगांत बुद्धगया मंदिराचें चित्र आहे. ४ आण्यांच्या तिकिटावर भुवनेश्वराचें चित्रहि तांबड्याच रंगांत होतें. तो रंग बदलून आतां ह्या तिकिटाचा रंग गडद निळा करण्यांत आला आहे.

**पावसापासूनच्या हानीस विम्याचें संरक्षण**— ऑस्ट्रेलियांत भरणाऱ्या रॉयल ईस्टर्न ॲग्रिकल्चरल शो ह्या प्रदर्शनाच्या चालकांनीं पावसापासून होणारी हानि टाळण्यासाठी ७२,००० पौंड रकमेचा विमा उतरला आहे. अशा प्रकारच्या विमापत्रकांत वरील विमापत्रक सर्वांत अधिक रकमेचें आहे, असें समजतें.

**स्वीडन आणि रशिया ह्यांचा व्यापारी तह**—स्वीडन व रशिया ह्यांनीं एक वर्ष मुदतीचा व्यापारी करार केला आहे. रशिया स्वीडनला मका, ओटस्, गुरें, क्रोम, मँगेनीझ इत्यादि वस्तू पुरवणार आहे. उलटपक्षीं स्वीडन रशिआला लोखंड, पोलाद आणि यंत्रसामुग्री पुरविणार आहे. ह्या कराराप्रमाणें २ कोटी पौंड किंमतीच्या मालाची देवाणघेवाण होईल.

**अमेरिकेला जाण्यास बंदी**—सुप्रसिद्ध विनोदी नट मॉरिस शिव्हॅलिअर ह्याला अमेरिकेंत जाण्यास बंदी करण्यांत आली आहे. ह्या बंदीचीं कारणें स्पष्ट करण्यांत आलेलीं नाहींत. परंतु त्याचें आगमन अमेरिकेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनें इष्ट नाहीं असें सांगण्यांत येतें. मॉरिस शिव्हॅलिअर ह्यानें स्टॉकहोमच्या शांतता सनदेवर सही केली असल्याचें वृत्त आहे.

**नारळांचें उत्पादन वाढवा**—भारतीय नारळ समितीचे अध्यक्ष सरदार दातारसिंग ह्यांनीं व्यापाऱ्यांना असें सांगितलें कीं सरकारच्या आयातविषयक धोरणाचा पूर्ण फायदा करून घेण्यासाठी व्यापाऱ्यांनीं नारळाच्या उत्पादनाच्या वाढीकडे अधिक लक्ष द्यावें.

**भारतासाठीं इराकचा गहूं**—इराकच्या सरकारनें भारताकडे १०,००० टन गहूं निर्यात करण्याला परवानगी देण्याचें ठरविलें आहे. इराक सरकारच्या पुरवठा समितीनें हा निर्णय घेतला आहे.

**पॅरिसमधील औद्योगिक प्रदर्शन**—पॅरिसमध्यें नुकतेंच एक औद्योगिक प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें. ह्या प्रदर्शनांत भारतामधील व इतर ३० देशांतील मिळून १०,००० प्रदर्शकांनीं भाग घेतला होता. सर्व प्रदर्शकांनीं मिळून सुमारें २०० चौरस मीटर जागा व्यापली होती. भारतीय प्रदर्शकांची संघटना पॅरिसमधील हिंदी वकिलातीनें केली होती. कापड आणि सतरंज्या वगैरे सामान मांडण्यांत आलें होतें.

**रेल्वेचे ७,००० डबे**—सौराष्ट्रामधील रेल्वेच्या कारखान्यांनीं बी. बी. अँड सी. आय. रेल्वेसाठी ७,००० डबे बांधण्याचें कबूल केलें आहे. अरुंद रुळांच्या रेल्वेवर चालू शकणारे २० डबे ह्या कारखान्यांनीं नुकतेंच दिले. दर महिना सुमारें ७०० डबे तयार होतील असा अंदाज आहे.

**५,००० स्वयंसेवक-शिक्षक**—मध्यप्रदेशांत सामाजिक शिक्षणाची मोहीम लवकरच हातीं घेण्यांत येणार आहे. ह्या कार्यासाठी ५,००० सुशिक्षित स्त्री-पुरुषांनीं आपलीं नांवें स्वयंसेवक म्हणून नोंदविलीं आहेत असें समजतें. मध्यप्रदेशाच्या २२ जिल्ह्यांपैकीं १७ जिल्ह्यांतील शिक्षकांची ही नोंद आहे.

**सुखद हवा राखणारे रेल्वेचे डबे**—सुमारें २ लाख रुपये खर्चून सुखद हवामान राखणारे ३० रेल्वेचे डबे बांधण्यांत येत आहेत. त्यापैकीं १५ माटुंग्याला जी. आय. पी. रेल्वेच्या कारखान्यांत, ६ ईस्ट इंडिआ रेल्वेच्या कारखान्यांत आणि ९ बंगाल-नागपूर रेल्वेच्या कारखान्यांत बांधण्यांत येत आहेत.

**भारतासाठीं खुषीची मदत**—भारताची अन्नधान्याची गरज लक्षांत घेऊन संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या नोकरवर्गानें स्वखुषीनें मदत फंड जमविण्यास सुरवात केली आहे. ह्या वर्गणीच्या पैशांतून गहूं विकत घेऊन तो भारताला पाठविण्यांत येणार आहे. गव्हांची वहातूक १० वहातूक कंपन्या मोफत करणार आहेत, असें समजतें.

**बिहारमधील नद्यांचा उपयोग**—उत्तर बिहारमधील बगमति आणि कमला ह्या दोन नद्यांना ठिकठिकाणीं बांध घालण्याचें बिहारच्या सरकारनें ठरविलें आहे. ह्या योजनेसाठी ४० लाख रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. योजना पूर्ण झाल्यावर सुमारें १-२ कोटी एकर जमिनीला हुकमी पाणीपुरवठा होऊं शकेल असा अंदाज आहे.

**लंडनच्या बाजारांत उत्तर प्रदेशांतील आंबे**—उत्तर प्रदेशांतील कलमी आंबे लवकरच लंडनच्या फळबाजारांत मिळूं शकतील. उत्तर-प्रदेश सरकारनें बी. ओ. ए. सी. ह्या विमान कंपनीच्या सहकार्यानें आंब्यांचीं पार्सलें इंग्लंडला पाठविण्याची व्यवस्था केली आहे. प्रथम हीं पार्सलें रेल्वेनें लखनौहून दिल्लीला धाडण्यांत येतील आणि नंतर विमानानें लंडनला धाडण्यांत येतील. आंब्यांच्या व्यापारांत दर मणामागें ७५ रुपये नफा होईल, असें समजतें.

**निरक्षरांना विवाहाची बंदी**—पूर्व जाव्हामधील एका खेड्यांत निरक्षर नागरिकांना विवाहाची बंदी करण्यांत आली आहे असें समजतें. निरक्षर ह्याचा अर्थ ज्यांना लिहितां अगर वाचतां येत नाहीं, ते असा करण्यांत आला आहे. ह्या खेड्याची लोकसंख्या सुमारें ३,००० आहे. हा हुकम सामाजिक शिक्षण खात्यातर्फे काढण्यांत आला आहे.

—सर्व प्रांतांतील—
सुती-गरम-रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
३६१, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. ९ मे, १९५१

संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे




## शेतीस कर्जपुरवठा

### रिझर्व्ह बँकेच्या सहाय्याच्या मर्यादा

शेतकामाच्या मोसमी कर्जाची कालमर्यादा १२ महिन्यांची १५ महिने करणारें रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (अमेंडमेंट) बिल पार्लमेंटनें मंजूर केलें आहे. ह्या बिलावरील चर्चेचे वेळीं अर्थमंत्री, श्री. देशमुख, ह्यांनीं शेतकी कर्ज-पुरवठ्याचे बाबतींत रिझर्व्ह बँकेच्या मदतीच्या मर्यादा स्पष्ट करून सांगितल्या. शेतकी कर्जपुरवठ्यास रिझर्व्ह बँकेचें अपेक्षित सहाय्य झालेलें नाहीं, अशी तक्रार नेहमीं ऐकूं येते. देशांतील चलन व पत ह्यांचें देशाच्या हिताच्या दृष्टीनें नियमन करणें, हें रिझर्व्ह बँकेचें आद्य कर्तव्य होय; आणि त्यासाठीं चलन काढणें, रिझर्व्हज राखणें, इत्यादि कामें तिला करावीं लागतात. देशांतील बँकिंगच्या व्यवसायाचें नियंत्रण करून बँकांना त्यांच्या चालू व मुदती ठेवींच्या कांहीं प्रमाणांत रक्कम रिझर्व्ह बँकेकडे ठेवण्यास लावणेंहि क्रमप्राप्तच होतें. म्हणजे, सर्व महत्त्वाच्या बँकांच्या ठेवींसाठीं रिझर्व्ह बँकेजवळ रिझर्व्ह साठून रहातो. बँकांना रिझर्व्ह बँकेकडे रकमा सक्तीनें ठेवाव्या लागतात; तेव्हां सहाजिकच त्यांच्या अडचणीच्या वेळीं त्यांना योग्य ती आर्थिक मदत रिझर्व्ह बँकेकडून मिळणें अपेक्षितच असतें. अशा परिस्थितींत रिझर्व्ह बँकेनें तिचेकडे जमा झालेले पैसे प्रदीर्घ मुदतीनें, धोका पत्करून किंवा विनातारण गुंतविणें कितपत न्याय्य होईल? म्हणूनच रिझर्व्ह बँकेला आपले पैसे नेहमीं तरते ठेवावे लागतात आणि त्यासाठीं त्यांचा फार मोठा भाग रोख किंवा तात्काळ वटवितां येण्याजोगे सरकारी रोखे अथवा ट्रेझरी बिलें ह्यांतच गुंतवावा लागतो. म्हणूनच रिझर्व्ह बँकेच्या व्यवहारावर कायद्यानें बंधनें घालून ठेवलेलीं आहेत.

शेतकऱ्यांना व्यक्तिगत प्रत्यक्षपणें कर्जें देणें, अथवा सहकारी बँकांना किंवा जुन्या पद्धतीच्या सावकारांना पुढें शेतकऱ्यांना त्यांनीं देण्यासाठीं रिझर्व्ह बँकेनें, मोठ्या रकमा कर्जाऊ देणें नित्याचा क्रम म्हणून शक्य होत नाहीं. सरकार ज्या पद्धतीनें कर्जें देतें, तशीं कर्जेंहि रिझर्व्ह बँक देऊं शकणार नाहीं. दुरुस्त कायद्याप्रमाणें, निगोशिएबल तारणाचे कागदावर रिझर्व्ह बँक कर्जें देणार आहे. परंतु मालाचा प्रत्यक्ष ताबा कर्जदाराकडे किंवा प्रथम कर्ज देणाऱ्या व्यापारी बँकेकडे राहिला तर त्याच्या मालकीची वर्गावर्गी करणारे निगोशिएबल कागदपत्र तयारच होत नाहींत, ही त्यांत एक मोठी अडचण आहे. रिझर्व्ह बँकेनेंच स्वतःच्या ताब्यांत माल घेऊन त्याचे तारणावर कर्जें द्यावयाचीं ठरविलीं, तरी शेतीच्या तयार मालास ती सोय उपयोगी पडणार नाहीं, आणि उभ्या पिकांस तर तिचा कांहींच उपयोग नाहीं. रिझर्व्ह बँकेच्या शेकडों नव्हे, हजारों शाखा देशभर असत्या आणि त्यांचेमार्फत कर्जें देऊन तारण मालाची साठवण करण्याची योग्य व्यवस्था असती, तरच ह्या बाबतींत कांहींतरी करतां आलें असतें. थोडक्यांत म्हणजे, आजच्या परिस्थितींत शेतीच्या धंद्यास लागणाऱ्या प्रचंड भांडवलाची गरज रिझर्व्ह बँक पुरवूं शकणार नाहीं; केवळ प्रतीक म्हणून तिनें कांहीं व्यवहार केला तर गोष्ट वेगळी. रिझर्व्ह बँकेच्यातर्फे शेतकी कर्जपुरवठ्याचा विचार करण्यासाठीं तज्ज्ञांची एक परिषद मुंबई येथें फेब्रुवारी महिन्याचे प्रारंभीं प्रा. धनंजयराव गाडगीळ ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. तिनें शेतीस कर्जपुरवठ्याचे बाबतींत रिझर्व्ह बँकेस अधिक उपयुक्त कार्य कसें करतां येईल, ह्याविषयीं चर्चा केली होती. शेतकऱ्यांच्या कर्जविषयक गरजा व त्यांना कर्जपुरवठा ह्यासंबंधीं रिझर्व्ह बँक आतां पहाणी करणार आहे. ह्या परिषदेच्या सूचना विचारांत घेऊन सरकार कालांतरानें आपला निर्णय ठरवील. परंतु शेतकी कर्जपुरवठ्याचे संबंधांत फारसें पुढें पाऊल पडण्याचा संभव नाहीं, हें स्पष्ट आहे. रिझर्व्ह बँकेवरील व्यापक जबाबदाऱ्या लक्षांत घेतां, शेतीला कर्जाची कितीहि गरज असली तरी ती समाधानकारक आणि नित्याची गोष्ट म्हणून भागविणें बँकेला शक्य होण्याचा संभव नाहीं, असें श्री. देशमुख ह्यांच्या भाषणाचें सार आहे.

## मध्य पूर्वेंतील आर्थिक परिस्थिति

मध्य पूर्वेंतील देशांत तेलाच्या खाणी असल्यामुळें सध्याच्या तंग जागतिक परिस्थितींत त्या देशांना विशेष महत्त्व आलें आहे. तथापि ह्या देशांमधील आर्थिक परिस्थितीसंबंधीं फारशी माहिती उपलब्ध नाहीं. संयुक्त राष्ट्रसंघाच्या आर्थिक आणि सामाजिक समितीनें मध्य पूर्वविषयींच्या एका अहवालांत ही माहिती सुसूत्रपणें दिली आहे. सदर माहितीचा गोषवारा पुढें दिला आहे.

मध्य पूर्वेंतील देशांची आर्थिक दृष्ट्या एकसंघी संघटना होण्याच्या मार्गांत महत्त्वाच्या अडचणी आहेत. ह्या भूभागांत रहाणाऱ्या लोकांचें रहाणीचें मान निकृष्ट आहे. त्यामुळें स्वदेशी अगर परदेशी मालाची मागणी विस्तार पावत नाहीं. इस्राएल देश सोडून बाकीचे मध्य पूर्वेंतील देश शेतीप्रधान आहेत. शेतीचा बहुतेक कच्चा माल प. युरोपमधील औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या राष्ट्रांना निर्यात करण्यांत येतो. तेलाखेरीज इतर खनिज पदार्थांबाबतही अशीच परिस्थिति आहे. बहुतेक सर्व देशांतून औद्योगीकरणाची दिशा एकच आहे. कापड, टिकाऊ अन्न तयार करण्याचे कारखाने, अशा प्रकारचे दुय्यम प्रतीचे धंदेच बहुतेक देशांतून उभारण्यांत आलेले आहेत. मध्य पूर्वेंतील देशांतील लोकसंख्या भराभर वाढत आहे; त्या मानानें अन्नाचें उत्पादन होत नाहीं. मृत्यूची दर हजारीं संख्या मोठी आहे, निरक्षरता फार आहे आणि रोगराईही पसरलेली आहे. भांडवलाचा तुटवडा असल्यानें परकीय भांडवलावर अवलंबून रहावें लागतें. तांत्रिक दृष्ट्याहि देश मागासलेले असल्यामुळें उत्पादनक्षमता अल्प आहे. ह्या सर्वांचा परिणाम म्हणून राष्ट्रीय उत्पन्न तुटपुंजें आहे; आणि आहे त्याची वांटणीही विषमतेनें होत आहे. पक्क्या

मालाची आयात अधिक आणि त्या मानानें निर्यात कमी आहे. अर्थात्‌च परदेशी व्यापारांत बहुतेक देशांना प्रतिकूल तफावतीला तोंड द्यावें लागतें.

### तेलाच्या खाणी

मध्य पूर्वेतील देश म्हणजे जगांतील तेलसाठ्याचा सर्वांत मोठा भूभाग आहे. जमाच्या एकूण तेलसाठ्यापैकीं दोनपंचमांश सांठा ह्या भागांत आहे. तेलाच्या खाणींचा धंदा मुख्यत: ब्रिटिश व अलीकडे अमेरिकन कंपन्यांनीं काढलेला व वाढवलेला आहे. मध्य पूर्वेत उत्पादन होणाऱ्या तेलाची सारखी वाढच होत आहे. सध्यां जगांत जितकें तेल उत्पन्न होतें त्याच्या एकपंचमांश मध्य पूर्वेत उत्पन्न होतें. ह्या कंपन्या तेलाची निर्यात करून जी परकीय हुंडणावळ मिळवतात ती त्या बहुतेक आपणाजवळच ठेवतात. ज्या देशांच्या हद्दींत तेलखाणी असतील त्यांच्या सरकारला दर पिंपामागें कांहीं रकम रॉयल्टी म्हणून देण्यांत येते. मध्य पूर्वेतील बहुतेक तेलाच्या विहिरींचा शोध गेल्या १५ वर्षांत लागलेला आहे. १९४८ सालअखेर मध्य पूर्वेत तेल शुद्ध करणारे १२ कारखाने होते. ह्या सर्व कारखान्यांचें मिळून दररोजचें उत्पादन सुमारें ९,४०,००० बॅरल्स इतकें होतें. १९४७ सालअखेर ८,३०,००० बॅरल्स उत्पादन होत असे. मध्य पूर्वेतील देशांच्या अंदाजपत्रकांत तेलावर मिळणाऱ्या रॉयल्टीच्या रकमेला बरेंच महत्त्व आहे. अरबस्थानच्या सरकारच्या उत्पन्नापैकीं ५० टक्क्यांपेक्षां अधिक उत्पन्न ह्या रकमेचें असतें. इराक आणि इराण ह्या देशांच्या सरकारांच्या अंदाजपत्रकीं उत्पन्नांत ११ ते १५ टक्के उत्पन्न रॉयल्टींच्या रकमेचें असतें. तेलाच्या कारखान्यांत अगर खाणीवर काम करणाऱ्या कामगारांपैकीं ८५ टक्के कामगार त्या त्या देशांचे रहिवासी आहेत. ह्या कामगारांपैकीं कांहीं जणांना शिक्षण देऊन कुशल कामगार करण्यासाठी कंपन्यांना शिक्षणाचे कार्यक्रम आखावे लागतात. तथापि, तेलाचा धंदाच तेवढा विकास पावलेला असल्यामुळें मध्य पूर्वेतील देशांच्या अर्थव्यवस्था एकांगी झालेल्या आहेत. त्यामुळें ह्या धंद्याचा देशांच्या सार्वत्रिक आर्थिक विकासाला जितका उपयोग व्हावयास पाहिजे तितका होत नाहीं. तसा तो व्हावयाचा असेल तर सर्व देशांचा तांत्रिक दृष्ट्या विकास करणें जरूर आहे.

### कै. श्री. बाळासाहेब पंतप्रतिनिधी ह्यांस उद्योगमहर्षि लक्ष्मणरावांची श्रद्धांजली

"शेतकरी जमिनीची मशागत करतो, पेरणी करतो, पण पुरेसा पाऊस व अनुकूल हवामान यांचें नैसर्गिक कृपाछत्र राहिलें, तरच शेतकऱ्याच्या श्रमाचें चीज होईल.

"किर्लोस्कर कारखान्याचें रोप किर्लोस्करवाडी येथें चाळीस वर्षांपूर्वी मी लाविलें असेल, परंतु श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधी, राजेसाहेब, औंध, यांचें सक्रिय उत्तेजन, हार्दिक पाठिंबा व शुभ आशीर्वाद व मनःपूर्वक दिलेला राजाश्रय यांचें छत्र या रोपावर नसतें तर त्याचा एवढा विस्तार—किर्लोस्करवाडी, हरिहर, बंगलूर, पुणें व लोणावळा येथें आज खचित झाला नसता."

ल. का. किर्लोस्कर
"किर्लोस्कर," मे १९५१

### महाराष्ट्रांतील साखर-कारखान्यांचें उत्पादन

महाराष्ट्रांतील साखर कारखान्यांचें साखरेचें चालू मोसमांतील उत्पादन गेल्या मोसमांतील उत्पादनापेक्षां समाधानकारक आहे. परंतु १९४८-४९ व १९४९-५० मधील सरासरी उत्पादनाच्या १०७% वरील उत्पादन अनिर्बंधपणें विकण्याच्या सवलतीचा फायदा त्यांना फारसा मिळण्याजोगा नाहीं. बेलवंडी शुगर फार्म्स, बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट, रावळगांव शुगर, सासवड माळी शुगर फॅक्टरी आणि वालचंदनगर इंडस्ट्रीज ह्यांना सवलत मिळणार आहे. तपशील खालीं दिला आहे:—

| कारखाना | ह्या मोसमांतील अपेक्षित उत्पादन (टन) | ४८-४९ व ४९-५० च्या सरासरीच्या १०७% |
|---|---|---|
| बेलापूर | १३,९५३ | १४,५४७ |
| बेलवंडी | ३,४०० | ३,९३६ |
| बृहन्महाराष्ट्र | ५,३०० | ५,२३३ |
| गोदावरी | १६,५०० | १७,०१३ |
| कोल्हापूर | ५,७०४ | ७,०१३ |
| महाराष्ट्र | १२,६४० | १५,३२४ |
| फलटण | १०,९९० | ११,२०० |
| रावळगांव | ९,१०० | ८,९८५ |
| सासवड माळी | ८,८०० | ८०९५ |
| चांगदेव | ४,२४० | ४ ७६७ |
| वालचंदनगर | १८,३०० | १७,५१४ |
| उगार | ४,८२० | ५,३३९ |
| एकूण | १ १३,७४७ | १,१८,४२७ |

### सारस्वत बँकेची पुणें कचेरी

सारस्वत को. बँक. लि. ची उपशाखा पुणें येथें सोमवार पेठेंत सारस्वत कॉलनीमध्यें आज, बुधवार ता. ९ मे रोजीं उघडण्यांत येत आहे. सारस्वत बँक १९१८ सालीं, सहकारी तत्त्वावर सर्व तऱ्हेचा बँकेचा व्यवहार करून बांधवांच्या आर्थिक उन्नतीचा प्रयत्न करण्याच्या उद्देशानें स्थापन झाली. सभासद, भागभांडवल, रिझर्व्ह व इतर फंड, ठेवी, कर्जे, इन्व्हेस्टमेंट, खेळतें भांडवल, इत्यादि सर्व बाबतींत सारस्वत बँक अग्रेसर आहे आणि आपल्या सभासदांच्या सामाजिक व आर्थिक व्यवहारांस वळण लावण्याचें कामीं तिनें बजावलेली कामगिरीहि अत्यंत महत्त्वाची आणि अनुकरणीय आहे. बँकेचा भक्कमपणा आणि सभासदांच्या गरजा भागविण्याची तत्परता व कार्यक्षमता ह्यांचा मिलाफ ह्या बँकेच्या व्यवस्थेंत आढळून येतो. व्यापारांत अनुभव व यश मिळविलेले पदवीधर कार्यकारी मंडळांत काम करण्यास सतत लाभणें, हेंहि ह्या बँकेचें एक वैशिष्ट्य आहे. मुंबई येथें गिरगांवांत बँकेची मुख्य कचेरी असून दादर, माहीम आणि बेळगांव येथें तिच्या शाखा व उपशाखा आहेत. श्री. वा. पुं. वर्दे हे कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष असून श्री. गो. मं. लाड हे उपाध्यक्ष आहेत, आणि सेक्रेटरी श्री. शं. वि. संझगिरी हे आहेत. पुणें उपशाखेसाठी बँकेनें एक स्थानिक समिति नेमली आहे, तिचे अध्यक्ष श्री. पां. वि. लाड हे आहेत. श्री. नी. रा. वरेरकर, बी. कॉम., हे एजन्ट म्हणून येत आहेत. सारस्वत बँकेचा उच्च दर्जा व तिचा लौकिक ह्यास साजेशी प्रगति पुणें उपशाखाहि लौकरच करील, असा विश्वास वाटतो.

### हिंद फायनॅन्स, इंडस्ट्रीज ॲंड इनव्हेस्टमेंट लि.

वरील कंपनी नागपूर येथें स्थापन झाली आहे. पैसे कर्जाऊ देणें, सेफ डिपॉझिट व्हॉल्टचा धंदा करणें, लहान प्रमाणावरील उद्योगधंदे काढून ते चालविणें, इनव्हेस्टमेंट ट्रस्ट कंपनीचा व्यवहार करणें, इत्यादि उद्देश कंपनीच्या उद्देशपत्रकांत आहेत. प्रत्येकीं ५० रु. चे १०,००० शेअर्स विक्रीस काढले आहेत. ५० हजारांचे शेअर्स खपले म्हणजे शेअर्स अलॉट करण्याचा डायरेक्टरांना अधिकार आहे. श्रीमंत पूर्णचंद्रराव गोपाळराव बुटी, श्री. शं. रा. श्रौती, श्री. रा. आ. साकरदांडे, श्री. गो. आ. भोंसुले, श्रीमती डॉ. कमल जोशी, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर( स्पे. डायरेक्टर), व श्री. गो. रा. श्रोती ( एक्स. ऑ. ) हे संचालक मंडळांत असून मेसर्स भोंसले, श्रौती आणि कंपनीकडे मॅनेजिंग एजन्सी आहे. श्री. भोंसुले, बी. कॉम., हे मध्यप्रदेश को. बँकेचे सेवानिवृत्त मॅनेजर आणि मध्यप्रदेश प्रीमिअर को. हौसिंग सोसायटीचे संस्थापक व माजी चेअरमन आहेत. श्री. श्रौती एम. ए. हे विमा तज्ज्ञ व व्यापारी आहेत. कंपनीचा पत्ता धनवटे चेंबर्स, सितावर्डी, नागपूर, असा आहे.

---

### श्री. काळे ह्यांच्या सेवेचा गौरव

आर्यभूषण–ज्ञानप्रकाशांतील प्रमुख मुद्रित तपासनीस श्री. रा. ज. काळे हे ४३ वर्षांच्या सेवेनंतर निवृत्त झाल्याची माहिती गेल्या अंकीं दिलीच आहे. आर्यभूषण–ज्ञानप्रकाश मुद्रणालयाची मालकी सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीकडे १९१० सालीं आली, त्याच्या आधीं १९०८ पासूनच ते ह्या छापखान्यांत काम करीत होते. त्यांच्या संस्कृत व मराठीवरील प्रभुत्वाचा आणि सामान्य ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा "अर्था"स मोठ्या प्रमाणावर त्याचे स्थापनेपासून गेल्या अंकापर्यंत सतत मिळाला आहे. सोसायटीकडून श्री. काळे ह्यांना योग्य पेन्शन मिळावें अशीच त्यांच्या कामाची माहिती असणारांची इच्छा असणार. त्यांच्या सेवेचें योग्य तें चीज होईल, अशी आशा आहे.

---

### " जय सहकार "

सहकारी सोसायट्यांच्या वेगवेगळ्या प्रकारांची माहिती देणारी व सहकारी क्षेत्रांतील कित्येक देखावे दाखविणारी, वरील नांवाची एक फिल्म सुरतचे श्री. कुमार मेहता ह्यांनीं तयार केली आहे. ती हिंदी भाषेंत असली, तरी मराठी, गुजराती व कानडी भाषांतहि तिचें रूपांतर करण्यांत येणार आहे.

---

### जागतिक संस्थांचें भारतानें देणें

भारत आज इंटरनॅशनल मो. फंडाचें ९ कोटी, ९९·८ लक्ष डॉलर्स व जागतिक बॅंकेचें ६ कोटी डॉलर्स देणें लागतो. हीं कर्जें अनुक्रमें हुंडणावळ विक्रत येण्यासाठीं आणि रेल्वेज, जमिन सुधारणा व बोकारा धरण योजना ह्यांसाठीं घेतलेलीं आहेत.

---

### हिंदी साखरेचें उत्पादन

चालू हंगामांतील हिंदी साखरेचें एकूण उत्पादन सुमारें ११ लक्ष टन होईल. १५ एप्रिल, १९५१ अखेरचें उत्पादन १०·६ लक्ष टन झालेलें आहे, आणि आणखी ४० हजार टन साखर तयार होईल अशी अपेक्षा आहे. मुंबईत साखरेची नियंत्रित व खुली किंमत दर मणास अनुक्रमें २४ रु. १२ आ. व ५६ रु. ८ आणे आहे.

---

**वनस्पति तुपाला द्यावयाचा रंग**—वनस्पति तुपाची भेसळ चांगल्या तुपांत करण्यांत येतें. तशी ती करतां येऊं नये म्हणून वनस्पति तुपांत मिसळण्यासाठीं आरोग्यदृष्ट्या विघातक नसलेला रंग शोधण्यासाठीं १०,००० रुपयांचें बक्षिस सं. प्रांत सरकारनें लावलें होतें. सरकारकडे रंगाचे १४० नमुने आले होते. परंतु सरकारतर्फे त्यांचें पृथःक्करण करण्यांत आल्यावर त्यांपैकीं एकहि योग्य नसल्याचें आढळून आलें.

**भारतांतून निघून जाणारे ॲंग्लो-इंडिअन्स**—सुमारें २८० ॲंग्लो-इंडिअन स्त्रिया आणि १५० पुरुष ह्यांनीं 'रांची' ह्या बोटीनें इंग्लंडचा रस्ता सुधारला. भारतांतील परिस्थिति दिवसें-दिवस बिघडत चालली असल्यानें आपण निघून जात आहों असें त्यांच्यापैकीं कांहीं जणांनीं सांगितलें. ब्रिटनमध्यें आपली नीट सोय झाली नाहीं तर आपण भारतांत परत येऊं असेंहि कांहीं जण म्हणाले. बहुतेक जण पूर्वी सरकारी नोकर होते.

**गोलघुमटाची दुरुस्ती**—विजापूर येथील इतिहास-प्रसिद्ध गोलघुमटाची दुरुस्ती करण्याचें काम दोन वर्षांपूर्वी चालू करण्यांत आलें होतें. हें काम आतां पूर्ण झालें असून घुमट प्रेक्षकांना पहाण्यासाठी लवकरच खुला करण्यांत येईल. घुमटाच्या आंत जो सज्जा आहे त्यांत उभे राहिलें तर त्याच्या विरुद्ध टोकाला घड्याळाची टिकटिकसुद्धां ऐकूं येते. ह्या प्रतिध्वनीबद्दल घुमट प्रसिद्ध आहे.

**मालगुजारांना द्यावयाचा मोबदला**—मध्यप्रांतांतील मालगुजारी नष्ट करण्याच्या कायद्यास अनुसरून नुकसानभरपाई म्हणून मालगुजारांना सुमारें ६७६ लाख रुपये द्यावे लागतील, असा अधिकृत अंदाज करण्यांत आला आहे.

---


## सारस्वत

### को-ऑपरेटिव्ह बॅंक लिमिटेड.

( स्थापना १९१८ )



हेड ऑफिस : सारस्वत बॅंक बिल्डिंग, मुंबई ४.
( टे. नं. ३१६७५ )

ठेवी : १,००,००,००० रु. वर

बॅंकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

शाखा व उपशाखा :

| दादर | माहीम | बेळगांव |
| --- | --- | --- |
| रानडे रोड बी बी. स्टेशन समोर | सारस्वत कॉलनी | मार्केट |

**बॅंकेची पुणें उपशाखा**
**बुधवार, ता. ९ मे १९५१ रोजीं उघडण्यांत येईल**

पुणें शाखा : सारस्वत सोशल युनियन, सारस्वत कॉलनी, सोमवार पेठ, पुणें.

वा. पुं. वर्दे, बी. कॉम.
चेअरमन
शां वि. संझगिरी, बी. कॉम.
सेक्रेटरी

# बँक ऑफ पूना लिमिटेड, पुणें

—: शाखा :—

( १ ) ११, भवानी पेठ, पुणें शहर ( २ ) ३६१, सदाशिव पेठ, पुणें शहर
( ३ ) टिळक चौक, सोलापूर ( ४ ) वखार भाग, सांगली

## दि. ३१ डिसेंबर १९५० रोजींची परिस्थिति दाखविणारीं संक्षिप्त पत्रकें

### ताळेबंद

| मांडवल व देणें | रु. आ. पै | जिंदगी व येणें | रु. आ. पै |
|---|---|---|---|
| मागणी केलेलें व वसूल झालेलें भांडवल | १२,५०,०००—०–० | कॅश व रिझर्व्ह बँकेकडे असलेली शिल्लक | ५,६३,२५३—५–३ |
| | | बँकांकडील शिल्लक–चालू खात्यांत | ९,९९,५७४—६–९ |
| रिझर्व्ह फंड | ५,०००—०–० | बिल्स डिस्कौंटेड व परचेसड् | ७४,३७१—१५–६ |
| ठेवी व इतर खातीं | २४,९२,५३६–१०–११ | इनव्हेस्टमेंटस् ( बाजारभावापेक्षां कमी असलेली किंमत ) | |
| बिल्स पेएबल वसुलीसाठीं आलेलीं बिलें ( येणेंकडे दाखविल्याप्रमाणें ) | १,३३,२२९—९–९ | प्रांतिक व मध्यवर्ती सरकारांचे कर्जरोखे व ट्रस्टी सिक्युरिटीज, ट्रेझरी बिल्स व शेअर्स | ६,३६,२१४—१–६ |
| | | कर्जे, कॅश क्रेडिटस् व ओव्हरड्राफ्टस | १७,४२,४७३—८–६ |
| इतर लायबिलिटीज प्रॉव्हिडंट फंड ११,५८५–५–० ब्रँच ॲडजस्टमेंटस् ११,३१३–९–९ | २२,८९८,—१४–९ | वसुलीसाठीं पाठविलेलीं बिलें ( देणेंकडे दाखविलेप्रमाणें ) | १,३३,२२९—९–९ |
| | | इमारत व जागा | १८,५००—०–० |
| | | फर्निचर व फिक्चर्स ( वजा घसारा ) | ३९,१५८—०–० |
| नफा तोटा खातें– मागील ताळेबंदांतून पुढें ओढलेली रक्कम ८६–०–८; १९५० सालचा निव्वळ नफा ३०,८१४–६–८ | ३०,९००—७–४ | इतर असेट्स स्टँप्स, स्टेशनरी, मोटार, इनव्हेस्टमेंटवर सांठलेलें व्याज, व्याज घेतांना कापलेला कर, प्राथमिक खर्च, शेअर्सवरील ब्रोकरेज, प्रॉ. फंड गुंतवणूक | ५८,७९४—०–३ |
| एकूण | ३९,३४,५६८–१५–६ | एकूण | ३९,३४,५६८–१५–६ |

### नफातोटा पत्रक

| खर्च | रु. आ. पै | जमा ( संशयित व बुडीत कर्जांसाठीं चालू सालीं केलेली तरतूद वजा करून ) | रु. आ. पै |
|---|---|---|---|
| ठेवींवर दिलेलें व्याज | २९,४८४—२–६ | व्याज आणि डिस्कौंट | १,३७,९८८—८–११ |
| कर्जावर दिलेलें व्याज | १,७७६—४–६ | | |
| पगार व भत्ते वगैरे | ४९,३७५–११–० | कमिशन, हुंडणावळ व ब्रोकरेज | ९,५८६—१–१० |
| प्रॉव्हिडंट फंड | २,४५८–१५–६ | | |
| ऑफिसभाडें, कर, विमे, दिवाबत्ती वगैरे | ४,४८४—४–६ | भाडें | ७०२—०–० |
| लॉ चार्जेस | १,१२९–१०–० | | |
| टपाल, तार व स्टँप्स | ३,३३९–१२–६ | इतर | २,८१२—५–१ |
| ऑडिट फी | १,०००—०–० | | |
| मालमत्तेवरील घसारा | ५००—०–० | | |
| स्टेशनरी, छपाई, जाहिरात, इ. | ९,४७२—०–६ | | |
| इतर खर्च | ४,९८४—७–१० | | |
| इनव्हेस्टमेंटवरील खरेदी-विक्रीतील तफावत | ५,२७६—४–० | | |
| फर्निचर, फिक्चर्स व वेहिकल्सवरील घसारा | २,६५३—२–३ | | |
| १९४९ चा इन्‌कमटॅक्स | ८३९—८–० | | |
| इनव्हेस्टमेंटवरील घसाऱ्यासाठीं तरतूद | २,५००–०–० | | |
| निव्वळ नफा ( ज्यावर इन्‌कमटॅक्स देणेंचा असा ) | ३०,८१४—६–८ | | |
| एकूण | १,५१,०८८–१५–९ | एकूण | १,५१,०८८–१५–९ |

एम. सी. लोया
चेअरमन

डी. आर. नाईक, एन. वी. परुळेकर,
एफ. पी. पोचा, एल. आर. राठी,
एन. एस. सोमाणी
डायरेक्टर्स.

के. डी. ओगलेकर
अकौंटंट.

जी. जी. साठे
मॅनेजर

एस. बी. बिलिमोरिया ॲंड कं.
चार्टर्ड अकौंटंटस्

### दर माणशी वार्षिक उत्पन्न २२५ रुपये

नॅशनल इनकम कमिटीच्या ( प्रो. महालनवीस अध्यक्ष, श्री. व्ही. के. आर. व्ही. राव व प्रो. धनंजयराव गाडगीळ ) प्राथमिक अहवालाप्रमाणें, भारताचें १९४८–४९ मधील राष्ट्रीय उत्पन्न ८,७१० कोटी रुपये होतें. दर माणशी वार्षिक उत्पन्न २२५ रुपये पडतें. एकूण उत्पन्नापैकीं ४,६६० कोटी रुपये म्हणजे सुमारें ५८% उत्पन्न अन्नावर खर्च झालें. त्याचा अर्थ रहाणीच्या इतर खर्चास फारच थोडा वाव होता, म्हणजेच दारिद्र्य भरपूर होतें. कमिटीची नेमणूक ४ ऑगस्ट, १९४९ रोजीं झाली होती आणि तिला सल्ला देण्यासाठीं सरकारनें तीन विदेशी तज्ज्ञ उपलब्ध करून दिले होते. अहवालांत १०२ पृष्ठें असून तीं सात प्रकरणांत व परिशिष्टांत विभागलेलीं आहेत.

### पर्शियाचे मागोमाग आतां क्युबा

चीन व पार्शिया ह्यांनीं ब्रिटिश तेल कंपन्या स्वतःकडे घेतल्या आहेत किंवा ते घेण्याच्या मार्गांत आहेत. इजिप्तमधील ब्रिटिश सैन्य हालविण्याचा आग्रह इजिप्तनें धरला आहे. क्युबामध्यें ब्रिटिश मालकीची १,२०० मैल लांबीची रेल्वे आहे ती घेण्याचा क्युबाचा निश्चय त्या देशानें ग्रेट ब्रिटनला नुकताच कळविला आहे. क्युबा, इजिप्त व पर्शिया ह्यांना ग्रेटब्रिटनच्या सामर्थ्याची पूर्वीइतकी भीति वाटत नसावी, असा ह्याचा अर्थ आहे.

### त्रावणकोर ऑगले ग्लास मॅ. कं. लि.

वरील कंपनीस ३१ डिसेंबर, १९५० अखेर संपलेल्या वर्षी ३७,०५९ रु. नफा झाला. ऑर्डिनरी भागांस ४% करमाफ डिव्हिडंड मिळणार आहे.

### आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा

१९५० च्या वृत्तांतवर्षीं वरील कंपनीनें १,००,९५२ रुपयांची माल–विक्री करून ४७,९८७ रु. ठोक व ७,७८३ निव्वळ नफा मिळविला. परंतु त्यांतून १,७०० रु. ची कराची तरतूद वजा करून ६,९८३ रु. नफा ताळेबंदाकडे घेण्यांत आला आहे. मागील वर्षअखेरच्या शिलकी तोटा वजा केल्यावर नफा वाटणीस २,०२१ रु. उरतात त्यांतून २% डिव्हिडंडसाठी १,९०७ रु. चा विनियोग करण्यांत आला. १९४८ अखेर कंपनीस असलेला १८,०९७ रु. चा तोटा १९४९ व १९५० मध्यें भरून काढून अर्कशाला आतां डिव्हिडंडहि देऊं शकली, ही अभिनंदनीय गोष्ट आहे. विरोधी परिस्थितींतूनहि कंपनीच्या कार्यकर्त्यांनीं मार्ग काढून वृत्तांत वर्ष यशस्वी केलें आहे उत्पादन खर्चांत बचत व्हावी व उत्पादनाचें मान वाढावें ह्यासाठी कांहीं यंत्रसामुग्री घेण्याची योजना संचालक मंडळानें आखली आहे. कंपनीचें वसूल भांडवल ९५,३७५ रु., असून ठेवी ६८,५०८ रु.च्या आहेत आणि ताळेबंद १,८५,७५५ रु. चा आहे.

( अध्यक्षः डॉ. वि. ल. आगाशे. सेक्रेटरीः के. जी. कुलकर्णी )

### दि न्यू ओरिअंट बँक लि., कोल्हापूर

अहवालाचे वर्षीं बँकेंतील निरनिराळ्या ठेवींमध्यें व खेळत्या भांडवलामध्यें बरीच वाढ दिसून येते. निव्वळ नफा २,०१९ रु. झाला. त्यापैकीं ४०० रु. रिझर्व्ह फंडांत टाकून १,५६७ रु. चा द. सा. द. शें. १ रु. ९ आ. प्रमाणें डिव्हिडंड देण्यासाठी विनियोग करण्यांत आला.

**संक्षिप्त ताळेबंद**

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | १,००,३१५ | रोकड | ७४,७२३ |
| रिझर्व्ह फंड | १,९१० | कर्जें | १,८३,६७२ |
| ठेवी | १,७६,८४७ | हुंडी खरेदी | १८,७९५ |

( चेअरमनः एन. के. पंडितराव, एम. ए., अॅडव्होकेट. मॅ. डायरेक्टरः बी. जी. देवगांवकर )


## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — म. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. कृ. खोले. — श्री. चं. रा. राठी.

श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. बा. ग. घंडुके.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठीं कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानाजिक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

रा. गो. आगाशे, बी. ए. ( ऑ. )
मॅनेजर.








## दि रत्नाकर बँक लिमिटेड

श्री. बी. बी. पाटील, बी. ए., एलएल. बी., चेअरमन, यांचें ७ व्या वार्षिक सभेच्या वेळचें भाषण

" १९४९ सालापेक्षां १९५० सालांत बँकेच्या एकंदर व्यवहारांतून ठेवीदारांना अधिक व्याज, स्टाफ वर्गास अधिक पगार देऊनही थोडा अधिक नफा दाखविणें शक्य झालें आहे. १९५० सालीं अनेक बँकांचे नफे कमी झाले असतांनाहि ही गोष्ट आपल्या बँकेच्या दृष्टीनें जास्त आशादायक वाटते. १९४९ सालापेक्षां १९५० सालीं ताळेबंदांत बँकेच्या करंट ठेवी अंदाजें साडेचार लाखांनीं कमी झाल्याचे दिसतात. त्याचें मुख्य कारण हिंदुस्थान सरकारनें गुळावर बसविलेलें कंट्रोल हें होय. गुळाचा मोसम सुरू होण्याच्या सुमारास आलेल्या सरकारी कंट्रोलमुळें माल बाजारांत येऊंच शकला नाहीं. योग्य भाव नसतांना गूळ उत्पादनास लागणारा मोठा खर्च करून बाजारांत गूळ विक्रीसाठीं पाठविणें शेतकऱ्यांना अशक्य झालें व हा माल दरवर्षाप्रमाणें बाजारांत येईल या अपेक्षेनें गेल्या सालच्या भावाच्या अंदाजानें व्यापाऱ्यांनीं शेतकऱ्यांना आगाऊ दिलेली रक्कम तशीच पडून राहिली व एकंदर बाजार पेठेंतील अनिश्चिततेमुळें शाहुपुरी पेठेंतील चलनवलन जवळजवळ थांबलें. या परिस्थितीमुळें शाहुपुरी सेंटरला त्याचा परिणाम मोठ्या प्रमाणावर भासल्याशिवाय राहिला नाहीं.

### बँक शेड्यूल्ड होणार

"इतर ठेवींचा एकंदर विचार करतां गेल्या वर्षापेक्षां मुदत ठेव अंदाजे १ लक्ष, ३४ हजारांनीं वाढलेली दिसते. व्यापाऱ्यांच्या गरजा व त्यांना वाटणारी नाणेभीड सारखी वाढत असली तरी एकंदर आर्थिक परिस्थितीचीं पावलें थोडी निराळीं पडत आहेत. कोणत्या वेळीं बाजारांत सरकारी नियंत्रणामुळें व जागतिक राजकारणांतील घडामोडींमुळें कोणती परिस्थिति निर्माण होईल हें सांगणें कठीण झालें आहे. त्यामुळें कर्जाचें प्रमाण न वाढवितां तें योग्य प्रमाणांत ठेवण्याचीच बँक धडपड करीत आहे. त्यामुळें केव्हां केव्हां व्यापारी लोकांची कुचंबणा होते, पण त्यास नाइलाज आहे.

"रिझर्व बँकेच्या सल्ल्यानुसार तारण व बिनतारण कर्जाचें योग्य प्रमाण ठेवून, येणाऱ्या तीन महिन्यांचे आंत बँक शेड्यूल्ड करणें हें आमचें ध्येय असून त्याबद्दल योग्य त्या दिशेनें प्रयत्न चालू आहेत. एकंदर परिस्थितीचा दूरवर विचार करून आपण आमच्या या धोरणास हार्दिक पाठिंबा देत आल्यानें आमचा उत्साह द्विगुणित झाला आहे.

### बँकांचें एकत्रीकरण

" १९५० सालीं एकंदर बँकिंग क्षेत्रांत आपल्या देशांत कांहीं महत्त्वाच्या घटना घडून आल्या आहेत. त्यांतील मुख्य घटना म्हणजे पश्चिम बंगालमधील चार मोठ्या शेड्यूल्ड बँकांचें एकीकरण हें होय. ह्या शतकाच्या प्रारंभीं प्रांतिक बँकांचें रूपांतर इंपीरियल बँक ऑफ इंडियामध्यें घडून आल्यानंतर, बँका एकत्रित येण्याबाबतची एवढी मोठी घटना झाली नव्हती. भारत बँकेचा कारभार पंजाब नॅशनल बँकेकडे जात आहे, ही दुसरी कर्ताजी घटना आहे. बँकांचें एकत्रीकरण ही गोष्ट तांत्रिक व व्यवहारिक दृष्ट्या अत्यंत अवघड असून त्यांतून निर्माण होणाऱ्या अनेक गोष्टींचा साकल्यानें विचार होणें अगदी जरूर आहे. प्रत्येक लहान बँकेनें पुढें येण्याकरितां केलेले परिश्रम व स्वार्थत्याग, त्यांची आपल्या गिऱ्हाइकाला हाताळण्याची स्वतंत्र वैशिष्ट्यपूर्ण हातोटी व त्या ज्या विभागांतून काम करीत त्या विभागांतील गिऱ्हाइकावर असलेली छाप व त्यांच्या हस्तें होत असलेली उद्योगधंद्यास मदत या गोष्टींचा विचार करितां, चांगल्या लहान बँकांचें गोजीरवाणें अस्तित्व गुटगुटीत लहान बालकासारखें टिकून रहावें असें वाटतें. रिझर्व बँक ऑफ इंडियासारख्या अत्यंत उपयुक्त व जबाबदार संस्थेनें दिलेला सल्ला व करीत असलेलें मार्गदर्शन एकंदर बँकांना उपयोगी पडण्यासारखें आहे. बँकिंग ॲक्ट झाल्यानंतर बँकांची परिस्थिति सुधारण्याबाबत रिझर्व बँकेनें केलेले परिश्रम खरोखर स्पृहणीय आहेत. "



## दि युनायटेड कमर्शिअल बँक लिमिटेड

अधिकृत भांडवल ... ८,००,००,००० रु. वसूल भांडवल ... २,००,००,००० रु.
खपलेलें भांडवल ... ४,००,००,००० रु. रिझर्व्ह फंड ... ६०,००,००० रु.

### ३१ डिसेंबर १९५० रोजींचा संक्षिप्त ताळेबंद

| देणें | रु. | येणें | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल ... | २,००,००,००० | रोख व बँकांत शिल्लक ... | ५,९९,७९,४५५ |
| जनरल व इतर रिझर्व्हज ... | ६०,००,००० | कॉलमनी ... | १५,००,००० |
| ठेवी ... | ३३,२८,४७,६१९ | बिल्स परचेस्ड ॲंड डिस्कौंटेड ... | ३,३७,४०,२११ |
| बिल्स पेएबल ... | ५७,०२,६२३ | इनव्हेस्टमेंटस ( बाजारभावापेक्षां कमी किंमतींनें ) ... | १६,७२,८१,२८६ |
| बँकांचें देणें ... | ३,११,६९,८२४ | कर्जें .. | १३,३८,९५,१६४ |
| बिल्स फॉर कलेक्शन ... | २,३९,२८,५६१ | जमीन व इमारती ... | १३,६८,०६४ |
| इतर देणीं ... | १४,४७,३८२ | बिल्स रिसिव्हेबल ... | २,३९,२८,५६० |
| लेटर्स ऑफ क्रेडिट, गॅरंटीज् इ. ... | ९,१८,२१,७७२ | लेटर्स ऑफ क्रेडिट, गॅरंटीज इ. ... | ९,१८,२१,७७२ |
| निव्वळ नफा ... | ३४,०७,१७३ | फर्निचर, फिटिंग्ज, मोटरी, इ. ... | ११,७२,९२८ |
| | | इतर येणीं ... | ६७,४८,०३७ |
| एकुण रु. ... | ५२,२२,४३,४७८ | एकुण रु. ... | ५२,२२,४३,४७८ |



हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.